राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
दाखल झालेले अपील

अपिल क्र.CIC/अ.क्र.६०९३ ते ६११४/२०२६

श्री. नीरजकुमार शंकर आखाडे
ओम ब्रम्हचैतन्य सगुरू समर्थ
आखडेनाथ महाराज समाधी मंदिर,
ताडदेव आरटीओ समोर, मुंबई-४०००३४.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक मुंबई (सा.बां.) मंडळ,
मुंबई बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
मुंबई बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई-४०० ००१.
(अपिल क्र.६०९३/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता
मुं.सा.बां.मं.मुंबई, बांधकाम भवन, ५ वा मजला, मुंबई-४०० ००१.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक अभियंता
मुं.सा.बां.मं.मुंबई, बांधकाम भवन, ५ वा मजला, मुंबई-४०० ००१.
(अपिल क्र.६०९४/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई-४०० ०१८.
प्रथम अपिलीय अधिकारी
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई-४०० ०१८.
(अपिल क्र.६०९५/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
एकात्मिकृत घटक यांचे उप विभाग क्र.२,
बांधकाम भवन, ५ वा मजला, मुंबई-४०० ००१.
प्रथम अपिलीय अधिकारी
एकात्मिकृत घटक यांचे उप विभाग क्र.२,
बांधकाम भवन, २ रा व ५ वा मजला, मुंबई-४०० ००१.
(अपिल क्र.६०९६/२०२६, ६११२/२०२६, ६११३/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
पश्चिम उप विभाग (सा. बां.) यांचे कार्यालय,
मलबार हिल, मुंबई-४००००६.
प्रथम अपिलीय अधिकारी
पश्चिम उप विभाग (सा. बां.) यांचे कार्यालय,
मलबार हिल, मुंबई-४००००६.
(अपिल क्र.६०९७/२०२६, ६१००/२०२६, ६१०१/२०२६, ६१०२/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई-४०० ०१८.
प्रथम अपिलीय अधिकारी
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई-४०० ०१८.
(अपिल क्र.६०९८/२०२६ आणि ६०९९/२०२६, ६१०३/२०२६, ६१०६/२०२६,)

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता इलाखा शहर (सा. बां.) विभाग,
बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई- ४००००१.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता इलाखा शहर (सा. बां.)विभाग,
बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई- ४००००१.
(अपिल क्र.६१०४/२०२६, ६१०५/२०२६, ६१०७/२०२६, ६१०८/२०२६, ६१०९/२०२६)

जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
दक्षिण (सा.बां.) उप विभाग, मंत्रालय समोर, मुंबई -४०००३२.
प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
दक्षिण (सा.बां.) उप विभाग, मंत्रालय समोर, मुंबई -४०००३२.
(अपिल क्र.६११४/२०२६)

<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.०७.२०२६</u>

अपीलकर्ता	:	अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी	:	उपस्थित (अपिल क्र.६०९३,६०१०,६१००,६१०४,६१०५,६११०)
प्रथम अपीलीय अधिकारी	:	अनुपस्थित

अपिलार्थीनी आज झालेल्या सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत लेखी निवेदन दिले असून नाना कारणांमुळे अद्याप पर्यंत माहिती प्रदान करण्यात आली नसल्याचे नमूद केलेले आहे.

वरील सर्व प्रकरणात अपिलार्थीनी सार्वजनिक बांधकाम विभागाची मुंबई सार्वजनिक बांधकाम मंडळ, मध्य मुंबई सार्वजनिक विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, एकात्मिकृत घटक, पश्चिम उपविभाग, इलाका शहर इत्यादी विविध कार्यालयांमध्ये सन २०२२ साली अनेक जोडपत्र दाखल करीत अपिलार्थीनी विविध प्रकारची माहिती मागितली असून झालेले काम, पारित करण्यात आलेली देयके, कार्यादेश इत्यादीची माहिती मागितली

असून यासंदर्भात या आधीच संग्राम सिंह महाडिक विरुद्ध **सार्वजनिक बांधकाम विभाग या प्रकरणात खालील प्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत :-**

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थींनी उपस्थित केलेली बाब ही अतिशय महत्त्वाची असून या आधीच **मा.कोकण खंडपीठाने कलम १९ (८)** अन्वये निर्देश जारी केलेले असून सद्य:स्थितीत सर्वच खंडपीठांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने हाती घेण्यात आलेली विकास कामे, या संदर्भातील विविध योजना, त्यासाठी राबविण्यात आलेली प्रक्रिया, आवंठित करण्यात आलेला निधी, झालेला खर्च, कामाचा टप्पा, कामाचा दर्जा या संदर्भात विविध शासकीय प्राधिकरण तसेच माननीय मुख्यमंत्री स्तरावर देखील मोठ्या प्रमाणात तक्रारी येत असतात. तसेच लोकप्रतिनिधींद्वारा देखील सार्वजनिक बांधकाम विभागासंदर्भात सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात असून अशा सर्व शंकांना योग्य उत्तर देण्यासाठी सर्व प्रकारची माहिती ही स्वयंप्रेरणेने (Proactive disclosure) उघड करणे आवश्यक असून प्रस्तुत प्रकरणी **कलम १९ (८) व २५ (५) अन्वये खालील निर्देश देण्यात येत आहेत:-**

कलम १९ (८) :- केंद्रीय माहिती आयोगास किंवा यथास्थिती राज्य माहिती आयोगास आपल्या निर्णय प्रक्रियेत पुढील अधिकार असतील.

(क) या अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करणे सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असतील अशा उपाय योजना करण्यास सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे ज्यामध्ये पुढील गोष्टींचाही समावेश असेल:-

(एक) एखाद्या विशिष्ट स्वरूपात माहिती मिळण्याची विनंती केली असल्यास त्या स्वरूपात माहिती पुरवणे.

(दोन) केंद्रीय जन माहिती अधिकाऱ्याची किंवा यथास्थिती राज्य जन माहिती अधिकाऱ्याची नियुक्ती करणे.

(तीन) विवक्षित माहिती किंवा माहितीचे प्रवर्ग प्रसिद्ध करणे.

(चार) अभिलेख ठेवणे त्याची व्यवस्था ठेवणे व तो नष्ट करणे या संबंधातील त्याच्या पद्धतीत आवश्यक ते बदल करणे.

(पाच) त्याच्या अधिकाऱ्यांना माहितीच्या अधिकाराचे प्रशिक्षण देण्याच्या तरतुदीत वाढ करणे.

(सहा) कलम ४ च्या पोट कलम (१) च्या खंड (ख) चे अनुपालन करून आयोगाला आर्थिक अहवाल सादर करणे.

(ख) कोणत्याही नुकसानीबद्दल किंवा झालेल्या अन्या हानीबद्दल भरपाई देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाला फर्मावणे.

(ग) या अधिनियमामध्ये तरतूद केलेली कोणतीही शासकीय लादणे.

(घ) अर्ज फेटाळणे.

कलम २५ (५) : माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २५ (५) अधिनियमान्वये सार्वजनिक प्राधिकरणाची कार्ये पार पाडण्यासंबंधीची त्यांची कार्यपद्धती या अधिनियमाच्या तरतुदींशी किंवा

आशयाची अनुरूप नाही, असे यथास्थिती केंद्रीय माहिती आयोग किंवा राज्य माहिती आयोग यांना दिसून आल्यास आयोगास अशी अनुरूपता आणण्यासाठी त्यांच्या मते ज्या उपायोजना करणे आवश्यक असेल त्या विनिर्दिष्ट करण्याची प्राधिकरणांना शिफारस करता येईल.

सार्वजनिक बांधकाम विभाग हे सार्वजनिक प्राधिकरण असल्याने सर्व क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून **कलम ४ (१) (ख) (११)** अन्वये योजना आणि कामांबाबतची सर्व माहिती दर ३ महिन्यांनी अद्ययावत करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच दिनांक १५.०७.२०१५ रोजी कोकण खंडपीठाने जारी केलेल्या निर्देशाप्रमाणे अद्ययावत माहिती संकेतस्थळावर प्रत्येक विभाग व उपविभागाकरिता स्वतंत्र **Thread** देऊन त्यामध्ये संबंधित विभागाद्वारे हाती घेण्यात आलेली कामे, सुरू असलेली बांधकाम/ रस्ते/ विविध विकास प्रकल्प यांचा तपशील त्या संदर्भात निविदा प्रक्रिया राबविली असल्यास व ती अंतिम झाली असल्यास त्या संदर्भातील तपशील, मंजूर केलेली रक्कम, उपरोक्त कामास प्रशासकीय मंजुरी मिळाल्याचा तपशील, आर्थिक वर्षनिहाय झालेला खर्च, प्रस्तावित खर्च, शिल्लक रक्कम, प्रदान करण्यात आलेली देयके व प्रलंबित असलेली देयके, संबंधित प्राधिकरणाने झालेल्या विकास कामाचे अवलोकन केल्यानंतर सादर केलेला प्रगती अहवाल, संबंधित कामाच्या दर्जाबाबत प्राधिकरणाने दिलेले प्रमाणपत्र, काम पूर्ण झाले असल्यास त्यासंदर्भात देण्यात आलेले प्रमाणपत्र, अंतिम देयक प्रदान केल्याबाबतचा तपशील, संबंधित काम हे सदोष आढळल्यास कंत्राटदारावर करण्यात आलेली कार्यवाही (कारणे दाखवा नोटीस), इ.असे सदोष बांधकाम दुरुस्त केल्याबाबत प्राप्त अहवालाची प्रत इत्यादी बाबींचा समावेश असावा.

राज्य सरकार अधिकाअधिक माहिती ही स्वयंप्रेरणेने उघड करण्याबाबत आग्रही असून मा.मुख्यमंत्री महोदयांनी नुकतीच महाराष्ट्र शासनातील सर्व प्रशासकीय व्यवस्था पारदर्शक, तंत्र व नागरिक स्नेही **(Techno friendly and Citizen friendly)** असावी असे वारंवार अधोरेखित केले असून विद्यमान मा.अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी यासंदर्भात योग्य ते प्रशासकीय निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागातील सर्व विभाग व उपविभागीय अधिकाऱ्यांना प्रचलित पद्धतीनुसार देण्याच्या निर्देशासह उपरोक्त निर्णयाच्या अधीन राहून वरील सर्व द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत.

आदेश

१. **वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
२. **अपिल क्र. ६०९३ ते ६११४/२०२६ निकाली काढण्यात येत आहेत.**

स्वाक्षरीत/-

मुंबई **(राहुल भा.पांडे)**

दिनांक : १५-०७-२०२६ **राज्य मुख्य माहिती आयुक्त**